REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार, तारीख २३ फेब्रुवारी, १९३८ | अंक २३

## अपूर्व योगायोग

## वेस्टर्न इंडिया

लाईफ इन्शुअरन्स कंपनी, लिमिटेड, सातारा.

या संस्थेचा

रौप्य महोत्सव आणि मूल्यमापन वर्ष

या संपूर्ण स्वदेशी आणि आदर्श विमा संस्थेचा

**रौप्य महोत्सव**

या वर्षअखेर साजरा होणार असून हेंच कंपनीचें

**मूल्यमापन वर्ष**

आहे हा एक अपूर्व योगायोग आहे. अग्रेसर भारतीय कंपन्यांपैकीं आदर्श अशा या कंपनीच्या हजारों विमेदारांपैकीं एक आपण झालांत आणि कंपनीच्या आनंदांत व यशांत भागीदार झालांत तर ते आपणांस निःसंशय फायद्याचें होईल.

**पहिल्या प्रतीचें त्रैवार्षिक बोनस**

| हयातीनंतरचा विमा | हयातींतील विमा |
|---|---|
| रुपये ७५ | रुपये ६० |

विशेष माहितीकरितां पत्रव्यवहार करा.

मॅनेजर.

## जाहिर नोटीस.

**औंध स्टेट सेंट्रल बँक लि. औंध**

शाखाः—आटपाडी, कुंडल, गुणद्वाळ, बिचूद, दिघंची

आम्ही मुदतठेवी खालील व्याजाचे दरानें स्वीकारतों :—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मुदत | १ | वर्ष | द. द. | २ | टक्के. |
| ,, ,, | २ | ,, | ,, ,, | २॥ | टक्के. |
| ,, ,, | ३ | ,, | ,, ,, | ३ | टक्के. |
| ,, ,, | ४ | ,, | ,, ,, | ३॥ | टक्के. |
| ,, ,, | ५ | ,, | ,, ,, | ४ | टक्के. |

औंध, ( जि. सातारा )
ता. २०-१-३८.

बी. आर. वर्तक,
मॅनेजर.



एच. एच. दि छत्रपति महाराजा
ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखालील

**जाधव कॉलेज ऑफ**

**टेलरिंग ॲन्ड कटिंग**

जानेवारीपासून नवीन वर्ग सुरू झाले. नांवें नोंदवा.
नवीन माहितीपत्रक मागवा. ४९७ बुधवार, पुणें.

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची
प्रमुख प्रॉव्हिडंट विमा कं.

**दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.**

च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.
माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

अप-टु-डेट शिलाई करतां

**महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा**

बुधवार चौक पुणें — १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [ खादी भांडाराचे माडीवर

## विविध माहिती

**बँकांस सुट्टी**

सोमवार, ता. २८ फेब्रुवारी, रोजीं महाशिवरात्रीनिमित्त बँका बंद रहातील.

**कुत्रापट्टीः मासिक ५ रु.**

ग्रेट ब्रिटनमध्यें शहर म्युनिसिपालिटीची कुत्रापट्टी सुमारें ५ रु. असते व ती पोस्टांत भरण्याची व्यवस्था असते.

**प्रचंड ग्रन्थनिर्मिति**

ग्रेटब्रिटनमध्यें प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांची संख्या दरसाल वाढत जात आहे. उतरत्या लोकसंख्येच्या प्रस्तुत युगांत कांहीं काळानें दरमाणशीं एक नवें पुस्तक, असें प्रमाण पडणें असंभवनीय नाहीं; किंवा लेखकांची संख्या इतकी झपाट्यानें वाढत आहे कीं, प्रत्येक मनुष्य स्वतःचेंच पुस्तक प्रसिद्ध करून इतरांचा त्रास चुकवील, असें एका ब्रिटिश साप्ताहिकानें विनोदानें भाष्य केलें आहे.

**दररोज ५०० नव्या मोटारींची भर**

गेल्या वर्षी ग्रेट ब्रिटनमधील रस्त्यांवरील वहानांत दररोज सरासरीनें ५०० मोटारींची भर पडली. ही वाढ अशीच कायम टिकल्यास १५ वर्षांचे अवधींत मोटारींची संख्या आजच्या मानानें दुप्पट होईल.

**ऑस्ट्रेलियांत तद्देशीयांची हकालपट्टी**

ऑस्ट्रेलियामध्यें (न्यू साउथवेल्स) श्वेतवर्णीयांनीं तद्देशियांचें उच्चाटनें घडवून आणलें आहे. १८७१ सालीं १२,००० तद्देशीय होते; आतां फक्त ९०९ उरले आहेत. कांहीं वर्षांनीं त्यांचा मागमूसहि रहाणार नाहीं; प्राणिसंग्रहालयांत त्यांचा नमुना राखून ठेवण्याची पाळी येईल !

**ट्रेझरी बिलांवर १ रु. ७ आ. ११ पै व्याज**

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत १½ कोटि रुपये किंमतीचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. ७ आ. ११ पै इतका पडला.

**सिनेमा धंद्यांत बेकारी**

ग्रेट ब्रिटनमध्यें सिनेमा फिल्म्स तयार करण्याचे धंद्यांत १० हजार माणसांस काम मिळतें, परंतु सध्या तेथील स्टूडिओ निर्जन होण्याची वेळ आली आहे. गेल्या नऊ महिन्यांत नवीन फिल्म्स फारच थोड्या निघाल्या; ३० स्टूडिओपैकीं बहुतेक सर्व रिकामेच आहेत. सहाजीकच, ह्या धंद्यांत बेकारी वाढली आहे.

**मॅट्रिकची परीक्षा वर्षांतून दोनदां होत नाहीं**

मॅट्रिकची परीक्षा वर्षांतून दोनदां घेण्यांत यावी, अशा अर्थाची नियमांत दुरुस्ती करणारा ठराव मुंबई विश्वविद्यालयाच्या सेनेटपुढें आला असतां तो नापास झाला.

**स्पेनमधील युद्धांत मॅड्रिड शहरांतील बळी**

स्पेनमधील चाललेल्या अंतस्थ युद्धांत आजपावेतों मॅड्रिड शहरांत विमानांतून झालेल्या बाँबफेकीमुळें १,१२७ घरें उध्वस्त झालीं आहेत आणि सहा हजार माणसें मृत्युमुखीं पडलीं आहेत. ह्या सहा हजारांत दोन हजार स्त्रिया व सहाशें मुलें आहेत.

**ऑस्ट्रियाचें वर्तनस्वातंत्र्य नष्ट होणार**

ऑस्ट्रिया जर्मन वजनाखालीं येऊं लागल्यामुळें इंग्लंड व फ्रान्स ह्या राष्ट्रांतील सरकारांचीं मनें अस्वस्थ झालीं आहेत. जर्मनीच्या वजनामुळें, महायुद्धानंतरच्या तहानें दिलेलें ऑस्ट्रियाचें वर्तनस्वातंत्र्य नष्ट झाल्यास मध्य युरोपांत राष्ट्रांचा एक शांततानाशक प्रबल गट बनेल अशी त्यांस भीति वाटत आहे.

**रात्रीची स्वस्ताई**

लिस्बन (पोर्तुगाल) शहरांत रात्रीं नऊनंतर भाड्याच्या मोटारींचे दर निम्मे केले जातात व हॉटेलांत खाद्य व पेय पदार्थहि स्वस्त मिळतात.

**रोग्यांस भेटावयास सहा आणे फी**

इस्पितळांतील रोग्यांस भेटावयास जाणारांकडून फी घेण्यांत येत नाहीं, परंतु आठवड्यांतील कांहीं वार सोडून बाकीच्या दिवशीं प्रत्येकाकडून सहा आणे वसूल करावे, अशी कांहीं ब्रिटिश इस्पितळांची खटपट आहे. ह्या फीमुळें पर्यायानें रोग्यांचाच फायदा होणार आहे, असें समर्थन करण्यांत येत आहे. उलट, फीमुळें कित्येकांची कुचंबणा होईल, ह्या अनिष्ट गोष्टीचाहि उल्लेख केला जात आहे.

**'बँक ऑफ बरोडा'चे सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स**

'बँक ऑफ बरोडा'च्या मध्यवर्ती कचेरीचे नव्या इमारतींत सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्सची योजना करण्यांत येणार आहे.

**म्हैसुरांत संत्रीं**

म्हैसूर संस्थानांत १९३४-३५ सालीं ३ कोटि संत्रीं तयार झालीं. त्यांचें एकूण वजन ८९,३४९ मण भरलें आणि त्यांची किंमत ९½ लक्ष रुपये झाली.

**इजिप्तमधील कपाशीस स्पर्धा भोवत नाहीं**

इजिप्तमधील कपाशीचें दर एकरी उत्पादन सालोसाल वाढत असून चालू वर्षाच्या उत्पन्नाइतकें उत्पन्न आजवर आलेलें नव्हतें. अमेरिकेंतील दर एकरी उत्पादनापेक्षा इजिप्तमधील उत्पादन दुप्पट आहे व कपासहि वरच्या दर्जाची निघते. ह्या कारणांमुळें इजिप्शन कपाशीस नेहमीच चांगली मागणी असते. कनिष्ठ दर्जाच्या कपाशीस ही कपास सहज मागें टाकूं शकते. सध्याच्या कमी बाजारभावानेंहि दर एकरी वाढत्या उत्पादनामुळें तेथील शेतकऱ्यास बरा पैसा मिळूं शकतो.

**लँकेशायरचें व हिंदी कापड**

लँकेशायरच्या कापडाची हिंदुस्थानांत होणारी आयात फारच घटली आहे. १९२९ मध्यें सुमारें ३४ कोटि रुपयांचें ब्रिटिश कापड ह्या देशांत आलें होतें. १९३७मध्यें ही आयात फक्त ७½ कोटि रुपयांची झाली. ब्रिटिश वसाहतींमध्यें लँकेशायरच्या मानानें हिंदुस्थान मात्र आपलें कापड अधिक प्रमाणांत पाठवीत आहे. ब्रिटिश व्यापाऱ्यांस ह्या गोष्टीचें वैषम्य वाटत असून हिंदी कापडाच्या ब्रिटिश वसाहतींत होणाऱ्या निर्गतीस निर्बंध घालण्यांत यावे अशी सूचना लँकेशायरचे कारखानदार करीत आहेत.

**रस्ते नादुरुस्त होण्याचें कारण**

शहरांतील रस्त्यांखालून ड्रेनेजचे व पाण्याचे नळ, विजेच्या तारा इत्यादि नेण्यांत आलेलीं असतात. नवीन नळ जोडणें अगर इतर कामें ह्यांकरितां रस्ता खणावा लागतो व त्यामुळें रहदारीस अडथळा येतो. गेल्या वर्षी मुंबई शहरांत अशा रीतीनें १ लक्ष, ९६ हजार फूट लांबीची पट्टी खणावी लागली. मुंबईमधील एकूण रस्त्यांची लांबी २२४ मैल भरते, त्यांपैकीं ३७ मैल असे उकरले गेले. खणलेले खड्डे भरण्याच्या खर्चानिमित्त कॉर्पोरेशननें २ लक्ष, ८ हजार रु. वसूल केले.

**मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत**

| | किंमत रु. |
|---|---|
| १३-२-३८ ते १९-२-३८ | ९२,९१,३५८ |
| २१-९-३१ ते १९-२-३८ | ३,११,०८,७२,८९३ |

अनुक्रमणिका


पृष्ठ

१ विविध माहिती ... ८६
२ अनियंत्रित व्यापाराच्या सिद्धांताची फेर तपासणी ८७
३ निर्गत व्यापाराचें महत्त्व ८८
४ हिंदी शेतीची सुधारणा... ८८
५ स्फुट विचार ... ८९
श्री. सुभाषचंद्र बोस ह्यांचें अध्यक्षीय भाषण– स्टँप ड्यूटीजच्या कायद्याचा मसुदा —चेक्स आणि दर्शनी हुंड्या ह्यांवर स्टँप ड्यूटी—विलाचा विचार लांबणीवर टाकण्यांत आला —पॉ.को.इन्स्टिट्यूटचें कार्य-क्षेत्र
६ गिरणी कामगारांचे मजुरींत वाढ ... ... ९१
७ चेक्सवरील ड्यूटीचें संकट टळलें ... ... ९२
८ लँकेशायरचें व हिंदी कापड ९२
९ बँकांकडील ठेवींत वाढ ९३
१० ट्रामगाड्यांची पीछेहाट ९३
११ अर्थशास्त्रीय सिद्धांत आणि आर्थिक धोरण ... ९४
१२ निवडक बाजारभाव ... ९५



# अर्थ

बुधवार, ता. २३ फेब्रुवारी, १९३८


## अनियंत्रित व्यापाराच्या सिद्धांताची फेर तपासणी

### हिंदुस्थानाचें संरक्षणविषयक धोरण

जागतिक आर्थिक मंदींतून बाहेर पडण्यास ‘ खुला व्यापार ’ हा उपाय अर्थशास्त्रज्ञ व राजकीय पुढारी सुचवीत आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापारांतील आडकाठी दूर होऊन देवघेव पूर्ववत चालू झाली, म्हणजे उद्योगधंदे सरसावून बेकारीस आळा बसेल असें त्यांचें म्हणणें आहे. हें ध्येय पूर्णत्वानें साध्य झालें नाहीं तरी जकाती कमी झाल्या व व्यापारी करारांमुळें व्यापार सुलभ झाला असतां बरीचशी सुधारणा होईल असा कांहीं लोकांना विश्वास आहे. ह्याच्या उलट, कित्येक राष्ट्रांनीं स्वयंपूर्ण होण्याचा चंग बांधला आहे. राष्ट्रीय उद्योगधंद्यांचें योग्य संरक्षण झाल्यानंतर खुल्या व्यापारास मान्यता देण्यास हरकत नाहीं, असा इतर कांहीं जणांचा अभिप्राय आहे.

व्यापारावर निर्बंध नसणें हेंच प्रत्येक देशाच्या अंतिम हिताचें असून संरक्षक जकातीचें धोरण हानिकारक आहे, अशी खुल्या व्यापाराच्या पुरस्कर्त्यांची भूमिका आहे. संरक्षणाचें धोरण निश्चयात्मक रीतीनें अहितकारक ठरणार, हें त्यांचें म्हणणें कितपत समर्थनीय आहे, हें पाहिलें पाहिजे. प्रत्येक देशांत ज्या वस्तू उत्पन्न करण्यास इतर देशांचे मानानें कमी खर्च लागतो, त्या वस्तू परदेशीं पाठविल्या जातात व ज्या वस्तू उत्पन्न करण्यास इतर देशांच्या मानानें अधिक खर्च येतो त्या आयात केल्या जातात. कोणत्याहि देशास अनेक धंदे करतां आले तरी त्यांपैकीं अधिक उत्पादक धंद्यांवर विसंबून कमी किफायतशीर धंद्यांतील माल परदेशांतून आयात करणें सोईचें व फायद्याचें पडतें. ह्या दोन सिद्धांतांवरच खुल्या व्यापाराचें धोरण उभारलेलें आहे.

डॉ. एरिच कॅरेल ह्या जर्मन अर्थशास्त्रज्ञानें “ खुला व्यापार व अधिकांत अधिक उत्पन्न ” ह्या आपल्या ग्रंथांत संरक्षक जकातींच्या धोरणाची छाननी केली आहे. वेगवेगळ्या देशांतील उत्पादन-खर्चामधील फरकामुळें व्यापार कसा घडून येतो हें त्यांनीं मान्य केलें असलें तरी त्यामुळें खुल्या व्यापाराचें सिद्धांतरूप समर्थन होत नाहीं, असें त्यांचें म्हणणें आहे. विशिष्ट धंद्यांस संरक्षण देणाऱ्या राष्ट्रांतील भोग्य संपत्तीचा पुरवठा खुल्या व्यापाराचे धोरणानें सर्वस्वी चाललें असतां होणाऱ्या पुरवठ्यापेक्षा मोठा असूं शकतो, हें त्यांनीं उदाहरणें देऊन सिद्ध केलें आहे. देशांतील कांहीं उद्योगधंद्याचें नियंत्रण करून व कांहींस उत्तेजन देऊन संपत्तींत जास्तींत ज्यास्त भर घालतां येईल, हें त्यांच्या विवेचनावरून स्पष्ट होत आहे. सबंद जग हें एकच राष्ट्र किंवा बाजारपेठ असें मानलें म्हणजे एका राष्ट्राचा नफा व दुसऱ्याचा तोटा हीं सम होतात. परंतु प्रत्येक राष्ट्राचा स्वतःसाठी आंतरराष्ट्रीय व्यापारांतील मोठ्यांत मोठा हिस्सा मिळविण्याचा प्रयत्न असतो, तो खुल्या व्यापारानें साध्य होऊं शकत नाहीं. कांहीं राष्ट्रीय धंद्यांस संरक्षण दिलें असतां हें शक्य होईल. व्यापारांत वाढ केल्यानें राष्ट्रीय संपत्तींत भर पडेलच, असें नाहीं; आपल्या देशास ज्यास्तींत ज्यास्त फायदा होईल अशा धोरणानेंच प्रत्येक राष्ट्रानें आपलें परराष्ट्रीय व्यापारविषयक धोरण आखलें पाहिजे. निर्भेळ खुल्या व्यापारानें राष्ट्रीय हित साधेलच असें नाहीं, आणि संरक्षक धोरण हें कांहीं बाबतींत अपरिहार्यच ठरेल, असा त्यांच्या ग्रन्थाचा निष्कर्ष आहे.

हिंदुस्थानांतील आर्थिक व औद्योगिक प्रगतीचे दृष्टीनें डॉ. कॅरेल ह्यांच्या विचारसरणीचें महत्त्व विशेष आहे. त्यांनीं पुढें मांडलेल्या मुद्यांचा आधार, पूर्ण चौकशीअंतीं हिंदुस्थान सरकारनें अंगिकारलेल्या संरक्षक धोरणास पूर्णपणें मिळत आहे. ह्या कारणानें खालीं सांगितल्याप्रमाणें प्रो. काळे ह्यांनीं ह्या जर्मन अर्थशास्त्रज्ञाच्या ग्रंथाकडे लोकांचें लक्ष वेधलें आहे. ह्या देशानें खुला व्यापार चालू दिला असता तर कपास कापडाच्या गिरण्या व साखरेचे कारखाने ह्यांत आतां गुंतलेलें भांडवल गहूं, कपास इत्यादि पिकांच्या लागवडीकडे वळलें असतें व कामगारांच्या चरितार्थाचा शेतीचे उत्पन्नावर भार पडला असता. शेतीच्या मालाचे बाजारभाव आधींच पडलेले आहेत, ते आणखी खालीं गेले असते व भांडवलावर व्याज सुटलें नसतें आणि लोकांस मजुरीहि पुरेशी मिळाली नसती. संरक्षक जकातीमुळें राष्ट्रास मिळणाऱ्या वाढलेल्या उत्पन्नाची बरोबरी त्यानें कधींच झाली नसती. सध्याच्या जागतिक परिस्थितींत खुल्या व्यापारास चिकटून बसणें आत्मघातकीपणाचें होईल व व्यापारावरील बंधनें दूर व्हावीं अशी घोषणा करणाऱ्या राष्ट्रांसहि खुला व्यापार किफायतशीर होणार नाहीं, असें डॉ. कॅरेल ह्यांचें म्हणणें आहे. हिंदुस्थानापुरतें बोलावयाचें झाल्यास संरक्षक धोरणामुळें ह्या देशाचा फायदाच झाला आहे, हें नाकारतां येणार नाहीं. डॉ. कॅरेल ह्यांच्या अर्थशास्त्रीय विवेचनाचें महत्त्व लक्षांत घेऊन “ फिनॅन्शल टाइम्स ” ह्या कलकत्त्याच्या मासिकाच्या जानेवारी महिन्याच्या अंकांत प्रो. काळे ह्यांनीं त्यावर एक परीक्षणात्मक लेख लिहिला असून हिंदी अर्थशास्त्रज्ञ, सरकार व जनता ह्यांचें प्रस्तुत विषयाकडे लक्ष वेधलें आहे. औद्योगिक संरक्षण सर्वस्वी वर्ज्य आहे ह्या सामान्य कल्पनेचा फोलपणा त्यांनीं दाखवला असून चर्चेचें व्यावहारिक रहस्य स्पष्ट केलें आहे.

---

## निर्गत व्यापाराचें महत्व

### ब्रिटिश बँकर्सचे उद्‌बोधक विचार

व्यापारविषयक व औद्योगिक परिस्थितीचें प्रतिबिंब बँकांच्या देवघेवींत नेहमीं पडलेलें दिसतें. ग्रेटब्रिटनमधील प्रमुख बँकांच्या व्यवहारांचा संबंध जगांतील इतर देशांशींहि येत असतो व त्यामुळें साहजिकच त्यांस जागतिक परिस्थितीकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावें लागतें. बँकेच्या वार्षिक सभेचे वेळीं आर्थिक परिस्थितीचा आढावा घेण्याची सदरहु बँकांच्या अध्यक्षांची वहिवाट आहे. तीस अनुसरून गेल्या महिन्यांतील सभांचे वेळीं प्रदर्शित झालेल्या विचारांचा गोषवारा खालीं दिला आहे.

मार्टिन्स बँकेचे अध्यक्ष, सर रिचर्ड डी. होल्ट, हे आपल्या भाषणांत म्हणाले:—

" ह्या देशांतील औद्योगिक मंडळ्यांची चलती व कामगारांची वाढलेली क्रयशक्ति हीं लक्षांत घेतलीं असतां निराशेस जागा ऱ्हाणार नाहीं. देशांतील अंतर्गत व्यापार व उलाढाली हीं समाधानकारक आहेत. ह्यापुढें प्रगति होण्यास परराष्ट्रीय व्यापारांत वाढ होणें आवश्यक आहे. इतर देशांशीं विचारविनिमय व करार करून ब्रिटिश निर्गत सुधारली पाहिजे, म्हणजे लँकेशायरच्या गिरण्यांस तेजी येईल. अमेरिकेशीं कराराबाबत वाटाघाटी चालू आहेत, त्याच धर्तीवर आणखी करार होऊन परराष्ट्रीय व्यापारांत क्रांति होईल, अशी आशा आहे."

बार्कलेज बँकेचे अध्यक्ष, मि. एडविन फिशर, हे आपल्या भाषणांत म्हणाले:—

"ग्रेट ब्रिटनची आर्थिक परिस्थिति आज चांगली आहे ह्यांत संशय नाहीं. चलतीचे मागोमाग मंदी येते; ह्या अनुभवानें हे चांगले दिवस टिकतील किंवा नाहीं याविषयीं लोकांस शंका वाटते. १९२९ च्या मानानें आजची स्थिति निराळी आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. युद्धोपयोगी मालाच्या उत्पादनाकडे सध्या निकडीनें लक्ष पुरविणें ब्रिटनला आवश्यक झालें व ह्या धंद्यांत हजारो लोकांस काम मिळालें. कालांतरानें हे लोक बेकार होऊं नयेत अशी औद्योगिक घडी बसविली पाहिजे. ग्रेटब्रिटन हा देश जितका माल निर्गत करतो, त्यापेक्षा अधिक किंमतीचा माल परदेशांतून आयात करतो. त्याचें कारण, परदेशी मालाच्याच रूपानें ब्रिटनला बाहेरून मिळकत होत असते. ब्रिटिश लोकांची उच्च रहाणी कायम टिकविणें असल्यास मालाची निर्गत वाढवून आयात व निर्गत ह्यांचा मेळ बसवण्याचा यत्न केला पाहिजे, म्हणजे ब्रिटिशांनीं परराष्ट्रासाठीं केलेल्या कामाच्या अदृश्य निर्गतीबद्दल मिळणारी मालाची आयात हा निवळ वाढावा आपल्या देशाच्या मिळकतींत भर घालील. ब्रिटिश आर्थिक जीवनाचा निर्गत व्यापार हा पाया आहे. हा व्यापार कायम तर राखलाच पाहिजे, परंतु त्याबरोबर त्यांत सतत मोठी वाढ होत राहील असा यत्न चालू ठेवला पाहिजे.

"आपलें कांहीं भांडवल इतर देशांत गुंतवून ठेवल्यास, अडीअडचणीचे प्रसंगीं त्याचा कसा उपयोग होतो, हें मागेंच निदर्शनास आलेलें आहे. ब्रिटनच्या अदृश्य निर्गत कामगिरीच्या आयात मालाच्या स्वरूपांतील मोबदल्यांत ह्या भांडवलावरील व्याजाचा प्रामुख्यानें समावेश होतो. १९३६ सालीं हें उत्पन्न जर मिळालें नसतें, तर ब्रिटनला आपली मालाची निर्गत २½ अब्ज रुपयांनीं वाढवावी लागली असती अथवा इतर देशांकरितां तितक्या मोलाचें काम करावें लागलें असतें किंवा त्या किंमतीनें आयात कमी करणें भाग पडलें असतें. निर्गतीचे मानानें आयात वाढली म्हणजे परराष्ट्रांत गुंतविण्याजोगी रकम कमी उरते. ह्या दृष्टीनें इतर देशांत गुंतलेलें भांडवल कायम राहील, असा यत्न केला पाहिजे. (१) खुला व्यापार, (२) परराष्ट्रांस पूर्ववत् रकमा कर्जाऊ देणें, (३) चलन स्थिर पायावर उभारणें, ह्या तीन गोष्टींवर जागतिक परिस्थितीची सुधारणा अवलंबून आहे. अर्थात्, परस्पर-विश्वासाविना कांहींच प्रगति होणार नाहीं. प्रत्येक देशानें वरील तिन्हींपैकीं एका मार्गानें जरी यत्न केला, तरी बरेंच कार्य होईल."

## हिंदी शेतीची सुधारणा

### उद्‌बोधक माहिती

(२)

सर ब्राइस बर्ट ह्यांनीं, सुधारलेल्या उंसानें व्यापलेल्या क्षेत्राविषयींचे आकडे सांगितले, त्यांवरून असें दिसतें कीं ह्या पिकाचे बाबतींत सुधारलेल्या जातींचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. शेकडा ७४ टक्के ऊंस आतां अशा जातींचा असून त्यामुळें साखरेच्या धंद्याचे प्रगतीस सहाय झालें आहे. काळजीपूर्वक लागवड केल्यास, ह्या सुधारलेल्या उंसापासून दरएकरीं दुप्पट उत्पन्न मिळूं शकतें. हिंदुस्थानांतील कपाशीच्या क्षेत्रापैकीं २२ टक्के जमीनींत सुधारलेल्या जातींची लागवड करण्यांत आली आहे व मध्यम प्रतीच्या धाग्याच्या कपाशीचें उत्पादन त्यामुळें १५ लक्ष गाठींचें २५ लक्ष गाठींवर गेलें आहे. गव्हाचे बाबतहि अशीच सुधारणा आढळून येते; एक पंचमांश जमीनींत नव्या जातींची लागवड होत आहे.

संशोधन क्षेत्रांतील सुधारणा शेतकऱ्यांपर्यंत पोंचविण्याचें काम अत्यंत बिकट असतें. त्यांच्या स्वतःच्या जमिनीवरच प्रात्यक्षिकें भरविण्याची पद्धति सर्वांत यशस्वी ठरली आहे. १९३५-३६ मध्यें अशीं ८६ हजार प्रात्यक्षिकें करण्यांत आलीं. सरकारी फार्म्स १५० आहेत, तीं वेगळींच. तेथें शेतकी शाळा व कॉलेजें ह्यांच्या पदवीधरांचे देखरेखीखालीं काम चालतें. नवीन जातींच्या पिकांचे प्रसाराबरोबर उत्तम दर्जाचें बीं-बियाणें पुरविण्याचा उद्योगहि शेतकी खात्यास करावा लागतो. गेल्या वर्षीं सरकारी खात्यामार्फत सुधारलेल्या जातींचें १२½ लक्ष मण बीं, उंसाचीं १½ कोटि पेरीं व फळझाडांचीं ६ लक्ष रोपें वांटण्यांत आलीं. शेतीचीं औतें व खतें ह्यांबाबतहि शेतकऱ्यांस सहाय देण्यांत आलें. शेतीमधील सुधारणा शेतकऱ्यांचे नजरेस आणण्याकरितां गेल्या वर्षीं १½ हजार ठिकाणीं प्रदर्शनें भरविलीं होतीं. देशी भाषेंतील पत्रकें, वृत्तपत्रांतील लेख, खेडेगांवांतून सदीप व्याख्यानें, खास वर्ग, ग्रामोफोनच्या तबकड्या, मोटारी व रेडिओ ह्यांचा उपयोग, ह्या सर्व मार्गांनीं प्रचारकार्य करण्यांत आलें. स्वतः शेतकरी व त्यांचीं गुरें ह्यांस चांगलें खावयास मिळणें अत्यंत आवश्यक आहे, ह्या दृष्टीनें प्रयत्न चालू आहेत.

सर ब्राइस बर्ट ह्यांनीं वर दिलेल्या माहितीवरून शेतीच्या सुधारणेसाठीं करण्यांत येत असलेल्या प्रयत्नांची रूपरेषा समजेल. हिंदुस्थानासारख्या अवाढव्य, शेतीप्रधान देशांत, सुधारणांस प्रचंड जागा आहे ह्यांत संशय नाहीं. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति सुधारणें हा ग्रामोद्धाराचा पाया आहे व ह्या दृष्टीनें अनेक प्रयत्नांची आवश्यकता आहे. शेतीसुधारणा ही प्रयत्नांची एक दिशा झाली. त्यांतच अडचणी किती तरी आहेत व क्षेत्र केवढें व्यापक आहे. तथापि, दीर्घ प्रयत्नांतीं फलप्राप्ति जवळ आल्याखेरीज रहाणार नाहीं, हें उघड आहे.

# स्फुट विचार

## श्री. सुभाषचंद्र बोस ह्यांचें अध्यक्षीय भाषण

हरिपुरा येथें भरलेल्या हिंदी राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष, बाबू सुभाषचंद्र बोस, ह्यांनीं केलेल्या भाषणावरून ह्या देशाच्या राजकीय व आर्थिक भवितव्यासंबंधानें पुढाऱ्यांच्या मताचा वारा कसा वहात आहे ह्याची स्पष्ट कल्पना येते. बाबूजींचें भाषण मुद्देसूद, असंदिग्ध व विधायक सूचनांनीं भरलेलें असें झालें. जागतिक घडामोडींच्या सूक्ष्म अवलोकनावरून सुचलेल्या विचारांचा परिपाक त्यांत झालला दिसतो आणि हिंदुस्थानांत आज अनेक जिव्हाळयाचे वादग्रस्त प्रश्न जनतेपुढें आहेत, त्यांसंबंधाचीं ठाम मतें व्यक्त केलेलीं आढळतात. त्यांचा स्वतःचा कल, समाजसत्तावादास अनुसरून हिंदी राष्ट्राची आर्थिक घटना बनवली जावी ह्या अभिप्रायाकडे निःसंदेह आहे. जागतिक घडामोडींमुळें ब्रिटिश साम्राज्याची घडी विस्कळित झाली आहे असें सांगून नवीन योजिलेली संयुक्त राज्य (फेडरल) घटना हिंदुस्थानाच्या प्रगतीच्या आड येणारी आहे हें सिद्ध करण्यासाठी त्यांनीं अनेक मुद्दे पुढें मांडले. हिंदी राष्ट्राच्या एकजुटीच्या मार्गांत ह्या फेडरेशनची आड काठी येऊन, उद्योगधंदे, व्यापार, चलन व्यवस्था, मध्यवर्ती सरकारचा खर्च, रेलवेज, ह्यांवर लोकशाहीची सत्ता नसल्यानें आर्थिक प्रगतीस तिचा विरोध कसा होईल हें त्यांनीं विशद केलें. शेतकरी व कामकरी वर्ग ह्यांच्या संघटनेच्या सहायानें राष्ट्रीय सभेनें राजकीय सत्ता मिळवावी आणि पुढें समाजसत्तावादाच्या तत्त्वांस धरून राष्ट्राची आर्थिक घडी बसवावी असें श्री. सुभाषबाबूंनीं सुचविलें. ह्याकरितां तात्काळ हातीं घेण्यासारख्या आणि सत्तेच्या प्राप्तीनंतर करावयाच्या गोष्टी ह्यांचें वर्गीकरण करून जहाल गटांच्या एकीकरणाची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादली. मोठ्या कारखान्यांच्या बरोबरीनें लहानसहान खेडेगांवीं उद्योगधंद्यांस हिंदुस्थानांत वाव आहे, एवढेंच नव्हे, तर येथें कांहीं काळपर्यंत त्यांची आवश्यकता आहे असें त्यांनीं सांगितलें. तथापि, यांत्रिक पद्धतीचें उत्पादन, जमीनदार व भांडवलवाले ह्यांच्या सत्तेचें राष्ट्रीकरण आणि बहुजन समाजाच्या हातीं अधिकाराचें संकलन ह्या गोष्टींवर त्यांनीं भर दिला. आपला दृढ विश्वास समाजसत्तामूलक राष्ट्रीय घटनेवर आहे ह्या संबधानें आणि युरोपांत विविध प्रकारांच्या घडून आलेल्या क्रांतिच्या अनुभवांचा दृढ संस्कार आपल्या विचारांवर झाला आहे ह्या विषयीं त्यांनीं आपल्या भाषणांत यत्किंचितहि शंका ठेवली नाहीं. हिंदी राष्ट्राचें राजकीय एकीकरण आणि सुचवलेला कार्यक्रम व व्यक्त केलेल्या कल्पना ह्यांच्या परस्पर-विरोधाचें अंधुक दृश्य त्यांच्या भाषणांत आढळतें आणि त्या विरोधाचा परिहार करण्याचा यत्नहि त्यांत प्रतीत होतो. त्यांतील ध्येयवादित्व आणि सूचित कार्यक्रम ह्यांचे पडसाद राष्ट्रीय सभेंतील व बाहेरील अनेक वर्ग, पक्षोपपक्ष व गट ह्यांच्या मतांवर कसे उठतील ह्यावर हिंदी राजकारणाची भावी दिशा व परिस्थिति अवलंबून राहील.

## स्टँप ड्यूटीजच्या कायद्याचा मसुदा

सर जेम्स ग्रिग ह्यांनीं मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत स्टँप ड्यूटीजचे बाबतीतल्या कायद्याचा मसुदा गेल्या आठवड्यांत पुढें मांडला. त्यांत तीन मुख्य गोष्टी होत्या. एक वर्ष मुदतीच्या हुंड्या (बिल्स ऑफ एक्सचेंज), ज्यांचे पैसे दर्शनी द्यावे लागत नाहींत अशा, स्टँप ड्यूटीस पात्र आहेत. त्यांचा दर कमी करून दर हजार रुपयांस दोन आणे ह्याप्रमाणें तो निश्चित व्हावा अशी पहिली योजना आहे. एक वर्षावरच्या मुदतीचीं बिल्स आणि बिल्स ऑफ लेडिंग ह्यांच्यावरील स्टँप ड्यूटीचे दर प्रांतांप्रांतांत भिन्न-भिन्न आहेत, त्यांमध्यें एकसूत्रीपणा आणावा ही बिलांतली दुसरी बाब आहे. चेक्स व दर्शनी हुंड्यांवरची स्टँप ड्यूटी १९२७ सालीं काढून टाकण्यांत आली, ती पुन्हा बसवावी आणि तिच्यापासून होणाऱ्या प्राप्तीची वांटणी प्रांतिक सरकारांमध्यें करण्यांत यावी अशी तरतूद बिलाच्या तिसऱ्या भागांत करण्यांत आली आहे. ह्या तीन योजनांपैकी पहिल्या दोन सर्वमान्य होण्यासारख्या आहेत व्यापारी मंडळें, प्रांतिक सरकार व रिझर्व्ह बँक ह्या सर्वांचा पहिल्या तजविजीस पाठिंबा आहे. मुदती हुंडयांचा उपयोग, त्यांवरील जबर स्टँप ड्यूटीमुळें मर्यादित होतो आणि व्यापार व बँकिंग ह्यांच्या प्रसारास त्यांचा विस्तार होणें अगत्याचें आहे. ह्या दृष्टीनें पहातां, बिलांत योजिल्याप्रमाणें मुदतीच्या हुंडयांवरील कर कमी झाला असतां ती गोष्ट हितकारकच ठरणार आहे. लांब मुदतीच्या हुंडया व बिल्स ऑफ लेडिंग ह्यांवरील स्टँप ड्यूटी सर्वत्र सारखी होण्यासंबंधानेंहि मतभेद असण्याचें कारण नाहीं. बिलाचा तिसरा भाग चेक्सवर बसवण्यांत येणाऱ्या कराविषयीं असून तो मात्र आक्षेपार्ह आहे.

## चेक्स आणि दर्शनी हुंड्या ह्यांवर स्टँपड्यूटी

करन्सी कमिशनच्या सल्ल्यावरून दहा वर्षांमागें पूर्वीं अस्तित्वांत असलेली चेक्स व दर्शनी हुंडया ह्यांवरची स्टँप ड्यूटी काढून टाकण्यांत आली. जनतेमध्यें बँकिंगच्या व्यवहारांचा प्रसार व्हावा, कागदी चलनाची लोकांस संवय लागावी आणि नाण्यांच्या ऐवजीं चेक्स व हुंड्या उपयोगांत आणण्याचा प्रघात लोकप्रिय व्हावा हा त्या करमाफी देण्याच्या धोरणाचा हेतु होता. सदरहु उद्देश जणूं काय आतां सफळ झाला असून ह्यापुढें चेक्सवर स्टँप असण्याविषयींचा कायदा झाल्यानें बँकिंगच्या संवयीस आळा बसण्याची भीति बाळगण्याचें कारण नाहीं ह्या समजुतीनें मध्यवर्ती कायदेमंडळापुढें असलेल्या बिलांत सरकारनें चेक्सवर स्टँप ड्यूटी बसवण्याच्या योजनेचा अंतर्भाव केलेला आहे. सध्या हिंदुस्थानांत बँकिंगच्या व्यवहारांची स्थिति अजून किती मागसलेली आहे आणि तीमध्यें प्रगति होण्यास किती मोठा वाव आहे ह्याची ज्यांस अनुभवानें माहिती आहे, त्यांस वरील कल्पना चुकीची आहे ह्याविषयीं सांगावयास नको. चेक्सवर बसवावयाच्या कराचें नवें उत्पन्न येईल आणि प्रांतिक सरकारांस त्यांच्या ओढगस्तीच्या सध्याच्या अवस्थेंत तें अत्यंत आकर्षक वाटेल ह्या भावनेनें हिंदुस्थान सरकारनें ह्या स्टँप ड्यूटीस पुन्हां जिवंत करावयाचें ठरविलें असलें पाहिजे. परंतु ह्या आमिषानें प्रांतिक सरकारांनीं भुलून जातां कामा नये. देशाच्या आर्थिक उन्नतीस बँकिंग आणि चेक्स व हुंड्या वापरण्याच्या संवयीचा प्रसार होणें अत्यंत आवश्यक असल्यानें ह्या प्रगतीच्या मार्गांत अडथळा आणणाऱ्या योजनांचा त्यांनीं व कायदेमंडळानें प्रतिकार केला पाहिजे.

## बिलाचा विचार लांबणीवर टाकण्यांत आला

बँकिंगचा प्रसार आतां सर्वत्र झाला असल्यानें, चेक्सवर ड्यूटी बसविली असतां त्यामुळें बँकिंगच्या प्रगतीस आडकाठी येण्याचा

संभव नाहीं, हें सर जेम्स ग्रिग ह्यांचें म्हणणें वस्तुस्थितीस सोडून असल्याचें प्रो. काळे ह्यांनीं येथील मराठा चेंबरचे अध्यक्ष ह्या नात्यानें सरकारला पाठविलेल्या पत्रांत आणि सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांनीं आपल्या एका मुलाखतींत स्पष्ट केलें आहे. हुंड्यांवरील ड्यूटी कमी करतांना चेक्सवरील ड्यूटी वाढवावी, असें रिझर्व्ह बँक सुचविणें शक्य नाहीं. गरीब व मध्यम वर्गास बँकिंगच्या सोई उपलब्ध होणें आवश्यक आहे, असें सांगून चेक्सवर ड्यूटी बसविणें म्हणजे प्रगतीस पायबंद घालणें आहे, असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला आहे. क्लिअरिंग हौसेसमार्फत होणाऱ्या चेक्सच्या उलाढालींवरून, चेक्सच्या व्यवहारांत विशेष वाढ झालेली दिसत नाहीं, असें त्या बाबतच्या आंकड्यांच्या तुलनात्मक परीक्षणावरून दिसून येतें. स्टँप ड्यूटी बिलास असलेला विरोध ध्यानांत घेऊन, सर जेम्स ग्रिग ह्यांनीं सदरहु बिलाचा विचार तहकूब ठेवण्याचें ठरविलें आहे. बिलांतील योजनांपासून मिळणाऱ्या निवळ उत्पन्नाचे मानानें बँकिंगच्या प्रगतीस येणाऱ्या अडकाठीचें स्वरूपांतील तोटा मोठा आहे, ही गोष्ट सर जेम्स ग्रिग ह्यांस पटून, ते चेक्सवर ड्यूटी बसविण्याचा विचार कायमचा सोडतील, अशी आशा आहे.

---

### प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटचें कार्यक्षेत्र

ह्या संस्थेचें उद्दिष्ट, तिची घटना व तिच्या कार्याचा व्याप ह्यांविषयीं आरंभीं कोणत्या आकांक्षा होत्या, गेल्या चार-पांच वर्षांत त्यांचे संबंधानें कोणते फेरफार घडून आले आहेत आणि आतां त्यांबाबत सरकारनें कोणती योजना निश्चित केली आहे ह्याची माहिती गेल्या आठवड्याच्या अंकांत आम्हीं दिली आहे. इन्स्टिट्यूटचें कार्य व महत्त्व ह्यांचें संकोचन अलीकडे कसें झालें आहे आणि आतां अधिक होऊं पहात आहे ह्याची तीवरून कल्पना येईल. सरकारच्या योजनेप्रमाणें शिक्षणाचे वर्ग व नियतकालिकें चालवणें, सदीप व इतर प्रकारचीं व्याख्यानें देणें, ग्रामोफोन व रेडियो, फिरते व बैठे पुस्तकसंग्रह ठेवणें, परीक्षा घेऊन प्रशस्तिपत्रें देणें, परिषदा भरवणें इत्यादि मार्गांनीं इन्स्टिट्यूटनें आपलें शिक्षणात्मक व प्रचाराचें काम करावयाचें आहे. त्याच्या इन्स्पेक्टरांच्या पगाराच्या निम्या रकमेइतकी सरकारकडून वार्षिक ग्रँट मिळेल. तूर्त तिची कमाल रकम १८,७५० रुपये निश्चित केलेली आहे. ह्याशिवाय, जिल्हा बोर्डांच्या फीच्या मिळकतीमधून दर रुपयास दोन आणेप्रमाणें त्यास दिले जातील. उत्पन्नाच्या इतर व किरकोळ बाबी आहेत. अशा प्रकारची ही नवीन व्यवस्था आहे आणि तिला मान्यता देऊन आपल्या कार्यपद्धतीची पुनर्रचना इन्स्टिट्यूट सरकारच्या सूचनेप्रमाणें करील अशी त्यांची अपेक्षा आहे. कार्यकारी मंडळापुढें हा प्रश्न विचाराकरितां आला असून इन्स्टिट्यूटच्या कौंसिलला त्याचा निकाल लवकर करावा लागेल. आपलें सहकारी चळवळींतलें उचित स्थान व मूलभूत दर्जा न गमावतां परिस्थितीस तोंड देण्याचें कार्य इन्स्टिट्यूटला करावयाचें आहे. तें अवघड असलें तरी अशक्य नाहीं.

---


## To Building Contractors

Item rate Tenders are invited from Contractors of standing and good experience in reinforced cement concrete work, for the construction of the West wing of the Deccan Education Society's Ramanbag School Building in Poona City. Approximate cost of work is Rs. 70,000/-, and it is to be completed within nine months.

Tender forms, specifications, conditions of contract etc. are available on payment of Rs. 10/- per set. Plans and drawings can be seen at the office of the undersigned between 2 and 5 P. M. on all working days. Tenders must reach the undersigned at his office not later than 5 P. M. on the 5th of March 1938.

The undersigned does not bind himself to accept the lowest or any tender.

Fergusson College
Poona 4.
19th February, 1938.

P. M. LIMAYE,
Secretary,
Deccan Education Society,
Poona.

फक्त तीनच वर्षे—

१९३७ मध्यें पुरें केलेलें काम २ कोटी ५ लाख रुपयांवर

विम्याचे हप्ते भरा
पुढें कोणत्याहि कारणामुळें जरी तुम्हास पैसे भरतां आले नाहींत तरी विम्याच्या पूर्ण रकमेची
आम्ही हमी घेतों.

आजच आमच्या एक्स्टेन्डेड ॲशुअरन्स स्कीमबद्दल लिहा:—

आमचें बेळगांव ऑफिसः—
व्ही. आर. नाईक, बी.ए., एलएल. बी.
इन्स्पेक्टर ऑफ एजन्सीज्
१६७६ बोगार वेस, बेळगांव.

डॉ. आर. के. गवंडे,
ब्रँच सेक्रेटरी.

आमचें भांबुडां सब-ऑफिसः—
एस्. व्ही. केळुस्कर,
इन्स्पेक्टर ऑफ एजन्सीज्, सोळस्कर यांचा बंगला, डेक्कन जिमखाना, पुणें ४.

भारत इन्शुअरन्स कंपनी, लिमिटेड. १७०५, लक्ष्मी रोड, पुणें २.

## गिरणी कामगारांचे मजुरींत वाढ

### चौकशी कमिटीच्या शिफारशी

कापड गिरण्यांत काम करणाऱ्या कामगारांच्या मजुरीच्या दराविषयीं चौकशी व जरूर त्या सूचना करण्याचें काम मुंबई सरकारनें एका कमिटीकडे सोंपविलें होतें. श्री. जयरामदास दौलतराम हे तिचे अध्यक्ष असून श्री. वैकुंठराय मेहता, प्रिन्सिपॉल धनंजयराव गाडगीळ व श्री. एस. ए. ब्रेलवी हे तिचे सभासद होते. चार सहकारी सभासदांचीहि नेमणूक करण्यांत आली होती. कमिटीचा अखेरचा रिपोर्ट अद्याप तयार व्हावयाचा आहे, परंतु तिच्या नेमणूकपत्रांतील दुसऱ्या कलमान्वयें, मजुरींत तात्काळ वाढ करण्याजोगी आहे किंवा नाहीं, ह्याविषयींची तिची शिफारस आधींच करण्यांत आली आहे.

कमिटीनें कापडधंद्याविषयींचें बारकाईनें निरीक्षण केलें. १९३६ नंतर मंदीचें पटल दूर झालें आहे, असें कमिटीस आढळून आलें. आयात कापडांत घट, अंतर्गत व्यापारांत सुधारणा, निर्गतींत वाढ व उत्पादनाच्या कार्यक्षमतेंत सुधारणा, ह्या चार गोष्टी कमिटीच्या नजरेंत प्रामुख्यानें भरल्या. एकंदरीनें हिंदी धंद्याची सर्वांगीण प्रगति होत आहे, असें कमिटीचें मत झालें. कपाशीच्या किंमतींत घट झाल्यानें धंद्यांतील नफ्याचें प्रमाण वाढलें आहे; १९३७-३८मधील कपाशीची किंमत त्यापूर्वीच्या वर्षाच्या मानानें निदान एकपंचमांशानें कमी भरेल; आयात कपाशीची किंमतहि किमान १५टक्क्यांनीं उतरली आहे, परंतु कापडाच्या किंमतींत मात्र घट झालेली नाहीं; उलट १९३५-३६ व १९३६-३७ च्या मानानें सध्या कापड महागच आहे असें कमिटीस आढळून आलें. एकूण उत्पादन खर्चाच्या मानानें खर्चांत ९·३ टक्के उतार पडला, त्यांतून वाढलेल्या खर्चाचे कांहीं बाबींसाठीं १·३ टक्के वजा केले तरी कापडाचे धंद्याचा निवळ नफा ८ टक्क्यांनीं वाढला असल्याचें कमिटीचें निश्चित मत आहे.

ह्या नफ्यापैकीं सर्वच भाग गिरणी कामगारांत वांटावा, असें कमिटीचें म्हणणें नाहीं. धंद्यांतील नफ्याची बाब कायम स्वरूपाची राहील, असें कमिटीस वाटतें; परंतु कामगारांसाठी आजारीपणाकरितां व म्हातारपणाकरितां तरतूद व इतर बाबींप्रीत्यर्थ गिरणी मालकांना कराव्या लागणाऱ्या खर्चाचा बोजा लक्षांत घेऊनच कमिटीनें आपल्या शिफारसी केल्या आहेत. एकूण उत्पादन खर्चांपैकीं शेकडा २२·५ इतकी रकम पगारांत खर्च होते, ह्या हिशेबानें मजूरीचे दरांत सरासरीनें १२ टक्के वाढ करण्यास हरकत नाहीं, असा कमिटीचा अभिप्राय आहे. कमिटीनें सुचविलेल्या पगारवाढीप्रमाणें, अहमदाबाद येथील गिरण्यांस कामगारांचे पगारावर ९ टक्के ज्यास्त खर्च करावा लागेल, मुंबईत ११·९ टक्क्यांनीं पगारांत वाढ होईल व सोलापुरांत १४·३ टक्क्यांनीं पगार वाढवावे लागतील.

मुंबई सरकारनें कमिटीच्या सूचनांस मान्यता दिली असून फेब्रुवारींतील कामावरील पगारापासून ह्या शिफारसी अंमलांत याव्या, अशी सरकारनें गिरणीवाल्यांस शिफारस केली आहे. इंडस्ट्रियल कोर्ट अथवा कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन ह्यांच्या निवाड्या इतकें कमिटीच्या शिफारसींस महत्व दिलें पाहिजे, असें सरकारचें मत आहे.

---


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळींच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ भिवंडी ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ वाई ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोला ( „ „ |

## खेळतें भांडवल रु. २०००००० चेवर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

### चेक्सवरील ड्यूटीचें संकट

हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जेम्स ग्रिग, ह्यांनी चेक्सवर स्टँप ड्यूटी बसविणारें एक बिल असेंब्लींत गेल्या आठवड्यांत मांडलें. मागें चेक्सवर एक आणा ड्यूटी होती, ती १९२७ सालीं रद्द करण्यांत आली होती. बँकिंगची संवय आतां दृढमूल झाली असल्यानें, ड्यूटी पुनः बसविण्यास हरकत नाहीं, असें आतां सुचविण्यांत आलें. ही ड्यूटी जमा करण्याचें काम मध्यवर्ती सरकाराकडे असून मिळकतीची वांटणी प्रांतांमध्यें करण्याची जबाबदारी घटना कायद्यानें त्यांवर टाकलेली आहे. ह्या उत्पन्नाची वांटणी सदरहू बिलानें पुढीलप्रमाणें सुचविली. दोन वर्षांचें अवधींत वाटणीच्या तत्त्वाचा पुनः खल केला जाईल.

| प्रांत | उत्पन्नांतील हिस्सा % |
|---|---|
| मद्रास | १५ |
| मुंबई | २० |
| बंगाल | २० |
| संयुक्त प्रांत | १५ |
| पंजाब | ६ |
| बिहार | १० |
| मध्यप्रांत व वऱ्हाड | ५ |
| आसाम | २ |
| सरहद्द प्रांत | १ |
| ओरिसा | २ |
| सिंध | २ |

चेक्सवरील ड्यूटीपासून एकूण सालिना उत्पन्न अजमासें ८३ लक्ष रुपये होण्याजोगें आहे. इतर बिलांवरील ड्यूटी कमी केल्यानें प्रांतिक सरकारांस येणारी तूट वरील ड्यूटीनें भरून आली असती, परंतु बिलास बराच विरोध दिसून आल्यावरून सर जेम्स ग्रिग ह्यांनी आतां बिलाचा विचार पुढें ढकलण्याचें ठरविलें आहे. पुनः बिल असेंब्लीकडे विचारासाठीं आणावयाचें किंवा नाहीं व आणावयाचें असल्यास तें केव्हां, हें तूर्त निश्चित ठरलेलें नाहीं.

---

### पंजाबमधील पाणीपुरवठ्याची नवी योजना

पंजाबमधील पाणीपुरवठ्याच्या हवेली योजनेच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ नुकताच पंजाबच्या गव्हर्नरांचे हस्तें पार पडला. झेलम व चिनाब ह्या नद्यांमधील पाण्याचा कांहीं भाग रावी नदींत वळविणें, हा वरील योजनेचा हेतु आहे. बंधारा बांधून पाण्याची उंची वाढवून एका कालव्याचे द्वारां हें पाणी रावीमध्यें सोडण्यांत येईल व त्यांतून सध्या अस्तित्वांत असलेल्या कालव्यांतून तें वाहील. हल्लींचा पाणीपुरवठा अपुरा आहे. हवेली योजनेमुळें सतत व भरपूर पाणी उपलब्ध होईल. संपूर्ण हवेली योजनेचा अंदाजी खर्च ५ कोटि, ३६ लक्ष रु. आहे.

---

### मुंबई शहरांत नवीन घरांची वाढ

नव्या इमारती बांधण्यासाठीं व जुन्यांची वाढ करण्यासाठीं मुंबई कॉर्पोरेशनकडे १९३६–३७ सालीं एकूण ३,९०४ अर्ज आले. १९३२–३३ मध्यें ही संख्या २,९९२ होती, ती एकसारखी वाढत आली आहे.

लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

## कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत."

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणें नं. २.

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंटस् नेमणें आहेत. तरी विशेष माहितीकरितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करावा.

### " अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

किं. १ रु. (ट. ख. निराळा)

व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला, पुणें ४.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००
खपलेलें भांडवल २,२५,००० वसूल झालेलें भांडवल १,१२,४००

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

### बँकांकडील ठेवींत वाढ

हिंदुस्थानांतील बँकांकडील ठेवींचे आंकडे खालीं दिले आहेत, त्यावरून बँकिंगच्या प्रगतीची कल्पना येईल:—

| वर्ष | एक्सचेंज बँका | त्यांचेकडील ठेवी (कोटि रु.) | व्यापारी बँका | त्यांचेकडील ठेवी (कोटि रु.) |
|---|---|---|---|---|
| १८७० | २ | १/२ | २ | १/७ |
| १९०० | ८ | १०१/२ | ... | ८ |
| १९३५ | १७ | ७६ | १०५ | ९० |

क्लिअरिंग हॉसेसमधून १९१३ सालीं ६५० कोटी रु. किंमतीच्या चेक्सची देवघेव झाली. १९३५ सालीं तत्सम आंकडा १८,८५ कोटि रु. होता. त्यापैकीं ७४४ कोटींची उलाढाल एकट्या मुंबईत झाली.

### 'दि इंडिपेंडंट'

कै. श्री. एम. व्ही. अभ्यंकर ह्यांचें स्मारक म्हणून चालविण्यांत येणारें, श्री. डब्यू. जी. शेवडे ह्यांचे संपादकत्वाखाली निघणारें वरील इंग्रजी साप्ताहिक प्रत्येक शनिवारीं नागपूर येथें प्रसिद्ध होत असतें. प्रांतिक बातम्यांबरोबर इतर ठिकाणच्या गोष्टींचाहि साप्ताहिकांत परामर्श घेण्यांत येतो. महत्त्वाच्या विषयांवर स्वतंत्र लेख 'इंडिपेंडंट' मध्यें येत असतात. इतर वृत्तपत्रांतील निवडक उतारेहि उद्बोधक असतात. चालू परिस्थितीचें आकलन करण्यास 'इंडिपेंडंट'चा चांगला उपयोग होईल. सोळा पृष्ठांच्या ह्या पत्राची किंमत केवळ एक आणा आहे.

### व्हेटरिनरी कॉलेजचें स्थलांतर

मुंबई येथील व्हेटरिनरी कॉलेजचें पुणें येथें स्थलांतर करण्याचा मुंबई सरकाराचा विचार आहे. त्यामुळें खर्चांत बचत होईल, अशी अपेक्षा आहे. १९३६–३७ मध्यें पशुवैद्यक शिकण्यासाठी ह्या कॉलेजांत ११३ विद्यार्थी होते. कॉलेजचें उत्पन्न १३१/२ हजार रुपये होऊन खर्च ६६१/२ हजार रु. झाला. काटकसर सुचविण्याकरितां मुंबई सरकारनें मागें टॉमस कमिटी नेमली होती, तिनें कॉलेज पुण्यास नेऊन तें शेतकी कॉलेजची एक शाखा म्हणून चालविण्यांत यावें असा अभिप्राय दिला होता.

### ट्रामगाड्यांची पिछेहाट

ग्रेटब्रिटनमध्यें ट्रामवेंची संख्या दिवसानुवस कमी होऊन बसेस वाढत आहेत. ट्रामवे मंडळ्यांची संख्या गेल्या वर्षी ८६ ची ७७ झाली. खालील कोष्टकांत १९१३–१४, १९२३–२४ व १९३६–३७ ह्या वर्षांसंबंधींचे आंकडे दिले आहेत:—

| वर्ष | विजेच्या ट्राम-गाड्या | ट्राम रस्त्यांची लांबी (मैल) | उतारूंचे प्रवास (कोटि) | तिकिटांचें उत्पन्न (कोटि रु.) |
|---|---|---|---|---|
| १९१३-१४ | १२,५१८ | २,५३० | ३३० | १९ |
| १९२३-२४ | १४,१८६ | २,६२४ | ४४४ | ३७ |
| १९३६-३७ | ९,७६९ | १,३४० | ३३८ | २३ |

१,९५० ट्रॉली बसेस सध्या उतारूंची वहातुक करीत आहेत. १९३६-३७ मध्यें ह्या बसेसमधून ६४१/४ कोटि लोकांनीं प्रवास केला. तथापि, ट्रामगाडी हेंच अद्याप ब्रिटनमधील शहरांतील वहातुकीचें साधन आहे.


— मनपसंत काम —

**रिसवूड ब्रदर्स-टेलर्स**

वक्तशीरपणाची गॅरंटी. सदाशिव हौदाजवळ, पुणें.

THE HOUSE OF MODERN STYLE SUITS.

**THE DECCAN TAILORING FIRM,** *DECCAN GYMKHANA, POONA 4.*

**TAILORS & CLOTH MERCHANTS**

*—A FRESH STOCK OF NEW DESIGNS—*

WOOLEN, COTTEN AND SILK SUITINGS, SHIRTINGS AND TROUSER FLANELS.

LONDON TRAINED CUTTER.

*MANAGER*—M. N. PATASKAR, *F. C. D. (London).*

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठीं भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण

पूना **गेस्ट हाऊस**

टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपती चौक-पुणें.

हवेशीर जागा

सुग्रास भोजन

उत्तम आदरातिथ्य

## अर्थशास्त्रीय सिद्धांत आणि आर्थिक धोरण

### प्रो. वा. गो. काळे यांचें व्याख्यान

वुइलिंग्डन कॉलेजांतील इतिहास-अर्थशास्त्र मंडळाची वार्षिक सभा गेल्या आठवड्यांत भरून एतद्विषयक विद्यार्थ्यांचें संमेलन पार पडलें. मंडळाचे कायमचे अध्यक्ष, प्रो. काळे, ह्यांनीं ह्याप्रसंगीं अध्यक्षस्थान मंडित केलें. मंडळाच्या वार्षिक वृत्तांतावरून त्याच्या विद्यमानें अनेक महत्त्वाच्या विषयांची बोधप्रद चर्चा झाली असल्याचें दिसून आलें आणि त्यासंबंधांतला विद्यार्थ्यांचा उत्साह व कळकळ हीं स्पष्ट व्यक्त झाली. ह्याबद्दल अध्यक्षांनीं पूर्ण समाधान व्यक्त केलें. आज जगांतील सर्व राष्ट्रांपुढें आणि विशेषतः हिंदी लोकांपुढें राजकीय व आर्थिक महत्वाचे अनेक अवघड प्रश्न उभे राहिले आहेत, त्यांस उत्तरें देण्याचें कर्तव्य इतिहास, राजकारण व अर्थशास्त्र यांच्या अभ्यासकांस करतां येईल किंवा नाहीं ह्या विषयाचें सोपपत्तिक विवेचन प्रो. काळे ह्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत केलें. अर्थशास्त्रीय सिद्धांतांच्या इतिहासाचें सिंहावलोकन करून त्यांतलीं शुद्ध तत्वें आणि सामाजिक व्यवहार ह्यांचा अन्योन्य संबंध काय आहे हें त्यांनीं विशद करून सांगितलें. मूलभूत आर्थिक सिद्धांतांमध्यें गृहीत धरलेल्या परिस्थितीचा प्रत्यक्ष व्यवहारांत अभाव दिसून येत असल्यानें नवीन निर्माण झालेल्या सामाजिक हालचालींस ते सिद्धांत लागू करतांना विशेष काळजी घ्यावी लागते. अर्थशास्त्रवेत्त्यांनीं केवळ तत्वशोधन करावयाचें असून व्यवहारासंबंधानें मत प्रदर्शित करणें किंवा सल्ला देणें हें त्यांचे कक्षेंत येत नाहीं. ही जुनी प्रवृत्ति बदलत आहे आणि बदलणें आवश्यक झालें आहे. तटस्थपणाची वृत्ति स्वीकारणें अर्थशास्त्रज्ञांस इष्ट नाहीं हें प्रो. कीन्ससारख्या विद्वानांनीं सिद्ध करून दाखवलें आहे. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, दारिद्र्य, सावकारी, बेकारी ह्यांसारख्या प्रश्नांची चर्चा हिंदुस्थानांत चालली असून त्यांसंबंधांत कायदे केले जात आहेत. अशा स्थितींत अर्थशास्त्राच्या अभ्यासकांनीं त्यांत मन घालून त्यांचे विषयींचे निर्णय सशास्त्र पद्धतीनें होण्यास सहाय केलें पाहिजे. रशिया, जर्मनी, इटली इत्यादि देशांत विचार व आचार ह्यांच्या क्रांत्या झाल्या आहेत आणि इतर देशांत कमी-अधिक प्रमाणांत फेरबदल होत आहेत. आपल्या देशाची विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेऊन योग्य ते बदल घडवून आणणें हिंदुस्थानांत आपणांस अपरिहार्य व युक्त आहे. अर्थशास्त्र व राजकारण ह्यांच्या हिंदी तरुण अभ्यासकांनीं ह्या विषयींचें स्वतःचें कर्तव्य केलें पाहिजे. वुइलिंगडन कॉलेजांतील इतिहास-अर्थशास्त्र मंडळाच्या कार्याचा ह्या कामीं अधिकाधिक उपयोग होईल अशी आशा आहे. वरील आशयाचें प्रो. काळे ह्यांचें भाषण झाल्यावर अल्पोपहार व फोटोग्राफ ह्यांचा कार्यक्रम झाला आणि नंतर प्रो. शर्मा ह्यांचें "मोगल अमदानींतली कला" ह्या विषयावर सदीप व्याख्यान झालें.

### टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणें : वार्षिक परीक्षा

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रवेश व वाङ्मय, व्यापार, आयुर्वेद या शास्त्रांच्या प्रथम, मध्यम, उपांत्य या परीक्षा सोमवार ता. १८ एप्रिल, १९३८ पासून व सदर शास्त्रांच्या "विशारद पदवी" परीक्षा सोमवार २ मे, १९३८ पासून विद्यापीठाच्या कचेरींचे जागीं सुरू होणार आहेत. अर्जांची अखेरची तारीख सोमवार ता. १८ मार्च, १९३८ ही आहे.


## औंध स्टेट सेंट्रल बँक लिमिटेड, औंध.

( स्थापना–८ आक्टोबर १९३२ )

हेड ऑफिस–औंध ( सातारा )

शाखा–आटपाडी, कुंडल, गुणदाळ, बिचूद स्टेशन व दिवंची.

चालू ठेवीवर शेंकडा दीड टक्का व्याज दिलें जातें. सेव्हिंग्ज ठेवीवर चेक स्वीकारून शेंकडा अडीच टक्के व्याज दिलें जातें. आम्ही मुदतीच्या ठेवीही स्वीकारतों. व्याजाचे दराबद्दल चौकशी करावी.

कर्जे–सोनें, चांदी, माल, सरकारी कर्जरोखे वगैरेचे तारणावर कर्जे दिलीं जातात.

चेक, हुंड्या, ड्राफ्ट वगैरे वसूल करून दिले जातात.

शेअर खरेदीबद्दल व इतर माहितीबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

B. R. Vartak

मॅनेजर.

## न्यू इंडिया ॲशुअरन्स कं. लि. मुंबई

( सर्व तऱ्हेचें विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी. )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यतः खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो:—

(१) कंपनीचें स्थैर्य. (२) उत्तम व्यवस्था.

(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता.

"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल.

प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.

श्री. डी. के. जोगळेकर, बी. ए.,

ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,

टिळक रोड, पुणें ( २ )

## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध **आर्डोमिक्स** ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेतेः—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )**

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | ११९-१२ |
| ५% ( १९३९-४४ ) लोन ... ... ... | १०४—९ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८-१२ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९७-१४ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०६—८ |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | १००—९ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) ... .. | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आंकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% ... ... | १४९--० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११५—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% ... | ३२—४ |
| इंपीरिअल बँक ( ५० ) १२% ... ... | १५७५—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११९--८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४¾% ... ... | १०४—४ |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९६--० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु. ४ आ. बोनस | ९५५--० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७५२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | ११९-११ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २०३-१२ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३३०--० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४२७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १५५--० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. ... ... | ४६-१२ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २१--४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ४ आ. ... | ४१--० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु. बोनस ... | ४,४००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०३-१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १६५—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | २४२—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १,०००—० |

#### सोनें-चांदी-साखर

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३४—७¾ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५०--४ |
| साखर जावा (तयार) प्रत्येक हंड्रेडवेटास ... ... | १५--४ |
| „ केसर प्रत्येक मणास ... ... | ११-१५ |
| „ सरया प्रत्येक मणास ... ... | ११—९ |


जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते.
भेटा अगर लिहा:—
**भाऊ गंगाधर साठे,** कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.


**गव्हाचे पोहे**
(REGD.) **( BLOSSOM )** (REGD.)

कित्येकांना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात. विशेषत: लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्यांचा उपयोग हितकारी ठरतो.

ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधांतून खातां येतात.

७५३ सदाशिव पुणें २. — भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे कारखानदार.

**ब्यांकेच्या उतरत्या व्याजाचे काळांत**
डॉन ऑफ इंडियाच्या ६% मासिक आवक ठेव योजनेचा फायदा ता. ३१-३-३८ पर्यंत देण्यांत येईल. माहिती करितां लिहा.
जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.



**टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स**
[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क ( काम ) तयार करतात. ]
मो. मु. टिळक
प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर,




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
**झारापकर टेलरिंग कॉलेज**
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

**The Home for**
**Reliable STENO-TYPIST & ACCOUNTANTS**
**MARATHI KENDRA : 292 *Sadashiv Peth* POONA**

## S. B. JOSHI & Co.

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

## पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

**रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.**

एरोमाक प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ.

## संजीवन हेअर टॉनिक

**दारुणा, केंस गळणें व टक्कल ह्यावर अनुभविक उपाय**

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद.

SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX.
Particulars by post or in person.

## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.

[ स्थापना सन १९३५ ]

**९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर**

कामाची वेळः—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

**चा**लू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

**से**विंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

**मु**दतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

**क**र्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.

## स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २४, किंवा प्रथम ६॥८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज; अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इन्व्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**

हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.

द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर-मुंबई.

यांचे

ओरिजिनल ब्राह्मी तेल

मेंदूचे विकार — व — डोकें दुखणें यांवर

बाळंतकाढा

मुलांकरितां बाळकडू. कुमारी आसव

नं. १ दहा दिवसांत घेणेचा.

नं. २ दहा दिवसांनंतर घेणेचा.


मुख्य दुकानः ठाकुरद्वार, शाखाः परळ वडाळा.

पुणें एजंटः—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार पेठ, पुणें

अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.

सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.

बेडेकर



डेक्कन मसाला


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ ज्ञानमुद्रण छापखान्यांत [illegible] यांनी छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे. बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. [illegible] पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.